**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**
**शनिवार, दिनांक ७ डिसेंबर, २०१९/ अग्रहायण १६, १९४१ (शके)**

**१४०. मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा मांडण्याबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या उभय सभागृहांच्या सदस्यांपुढे गत सत्रात दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या **मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर मंगळवार, दिनांक १७ व बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी चर्चा होणार आहे. आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या असल्यास त्या ३ प्रतींमध्ये बुधवार, दिनांक ११ ते शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, नागपूर येथे देण्यात याव्यात.**

निदेशानुसार असेही कळविण्यात येते की, **म.वि.प. नियम ५९ मधील परंतुकानुसार कोणत्याही सदस्याला अशा सुधारणांच्या दहा पेक्षा जास्त सूचना देता येणार नाहीत.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ डिसेंबर, २०१९.

**राजेन्द्र ग. भागवत**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रती :**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
६. प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

----------